**पोलीस उप आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष,**
**गुन्हे शाखा, बृहन्मुंबई यांचे कार्यालय**

---

**-: प्रेस नोट :-** दिनांक - २५/०७/२०२६

**अंमली पदार्थ विरोधी कक्ष यांची बृहन्मुंबईमध्ये PIT-NDPS अंतर्गत कारवाई दरम्यान ड्रग्ज् तस्करी करणारा इसम नामे उस्मान अब्दुल कादर शेख उर्फ सोनु,वय ३७ वर्षे,यास १ वर्षे करीता नाशिक मध्यवर्ती कारागृह, नाशिक येथे स्थानबध्द केलेबाबत.**

अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे आझाद मैदान युनिट, अं.प.वि.कक्ष, मुंबई यांनी त्यांचेकडील गु.र.क्र. १४/२०२६, कलम ८ (क) सह २१ (ब) एन.डी.पी.एस.कायदा १९८५ अन्वये दाखल गुन्हयात अंमली पदार्थाची तस्करी करणारा अटक आरोपी सराईत गुन्हेगार उस्मान अब्दुल कादर शेख उर्फ सोनु, वय ३७ वर्षे, रा. ठि रुम नं.०५, तळमजला, हालीमा मंजिल, क्लियर रोड, नागपाडा, मुंबई याचेवर अंमली पदार्थाची तस्करीचे एन.डी.पी.एस. कायदयान्वये एकुण ०४ गुन्हे दाखल असल्याचे दिसुन आले. तसेच नमुद गुन्हयात मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असुन ते न्यायप्रविष्ठ होते. तसेच सदर ड्रग्ज् तस्करी करणारा इसम उस्मान अब्दुल कादर शेख उर्फ सोनु, वय ३७ वर्षे, हा जामीनावर सुटताच परत अंमली पदार्थाचा व्यवसाय करत असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे त्याचेविरुदध मा. पोलीस आयुक्त सो. बृहन्मुंबई यांचे वतीने अंमली औषधीद्रव्ये व मन:प्रभावी पदार्थ विधिनिषीद्ध व्यापार प्रतिबंध अधिनियम १९८८ (PIT NDPS ACT 1988) अन्वये अंमली पदार्थ विरोधी कक्ष, आझाद मैदान युनिट, गु.शा. मुंबई यांनी स्थानबध्द आदेश जारी होण्याकरीता मा. स्थानबध्द अधिकारी तथा प्रधान सचिव (विशेष) गृह विभाग, महाराष्ट्र शासन यांस प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

सदरच्या स्थानबध्द प्रस्तावास गृह विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडुन मंजुरी आदेश प्राप्त झाले. त्यानुसार नमूद इसमास दिनांक-२४/०७/२०२६ रोजी तळोजा कारागृह येथे जावुन ०१ वर्षाकरीता स्थानबध्द आदेशाची बजावणी करण्यात आली असून मा.कारागृह अधिक्षक, तळोजा कारागृह हे नमूद इसमास मध्यवर्ती कारागृह, नाशिक रोड, नाशिक येथे स्थानबध्द करणार आहेत.

**अंमली पदार्थ विरोधी कक्षाने सन २०२६ मध्ये अंमली औषधीद्रव्ये व मन:प्रभावी पदार्थ विधिनिषीद्ध व्यापार प्रतिबंध अधिनियम १९८८ (PIT NDPS ACT 1988) अन्वये सन २०२६ मध्ये जामीनावर सुटल्यानंतर वांरवार गुन्हे करणा-या अकरा आरोपींना स्थानबध्द केले असून ही स्थानबध्दतेची बारावी कारवाई आहे.**

उस्मान अब्दुल कादर शेख उर्फ, वय ३७ वर्षे, हा अंमली पदार्थ व्यवसायात सक्रीय असुन त्याच्याविरुध्द १) जे.जे.मार्ग पोलीस ठाणे, २) अं.प.वि.कक्ष, बांद्रा युनीट, ३) अं.प.वि.कक्ष, आझाद मैदान युनिट तसेच ४) वागळे ईस्टेट पो.ठाणे, मालमत्ता शाखा, गु.शा., मुंबई असे एकुण ०४ गुन्हे दाखल आहेत.

सदरची यशस्वी कामगिरी ही मा. श्री. देवेन भारती, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मा.श्री.अनिल कुंभारे, पोलीस सह आयुक्त(गुन्हे), मा.श्री कृष्णकांत उपाध्याय, अपर पोलीस आयुक्त(गुन्हे), यांचे मार्गदर्शनाखाली मा.श्रीमती पौर्णिमा चौगुले-श्रींगी, पोलीस उप आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई, व मा. श्री.सुधीर हिरडेकर, सहाय्यक पोलीस आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई अं.प.वि.कक्ष, गुन्हे शाखा, आझाद मैदान युनिटचे प्रभारी पो.नि. शैलेश सुर्यवंशी, यांचे नेतृत्वाखाली पोलीस उप निरीक्षक प्रमोद आवळे , तसेच गुन्हे प्रतिबंधक शाखेचे व.पो.नि. सुवर्णा अडसुळे, पो.नि. सरीता गावडे, स.पो.नि. रविंद्र पाटील, पो.उ.नि. संदिप शिंदे, पो.उ.नि. सतिश निंबाळकर यांनी केली आहे.

------oooo------